सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

GOVERNEMENT COLLEGE OF ENGINEERING,AURANGABAD
(AN AUTONOMOUS INSTITUTE OF GOVERNMENT OF MAHARASHTRA)
STATION ROAD OSMANPURA AURANGABAD – 431 005

PHONE No. (0240) 2366101 , 2366221
Fax : (0240) 2332835
Email : office.gcoeaurangabad@dtemaharashtra.gov.in
website : https://www.geca.ac.in

# 10th Meeting of Finance Committee

## Date : 11th Jan 2019

## Minutes of Meeting

# शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, औरंगाबाद

**इतिवृत्तान्त**

जा.क्र.शाअमऔ/अर्थसबै/लेखा/स्टेनो/२०१९/229

**दिनांक** :- १६/०१/२०१९
16 JAN 2019

दिनांक ११/०१/२०१९ रोजी दुपारी ४.०० वाजता डॉ. पी.बी. मुरनाळ, प्राचार्य यांच्या अध्यक्षतेखाली प्रशिक्षण व आस्थापना कक्षात अर्थ समितीची (Finance Committee) बैठक आयोजित करण्यात आली होती व खालील अधिकारी बैठकीस उपस्थित होते. सदरील बैठकीचा इतिवृत्तान्त.

| अ.क्र. | अधिकारी यांचे नाव व पदनाम |
|---|---|
| ०१ | मा. श्री आर.डी. वैद्य, सदस्य, व्यवस्थापन मंडळ |
| ०२ | डॉ. पी.बी. मुरनाळ, अध्यक्ष, अर्थ समिती |
| ०३ | डॉ. यु.जे. कहाळेकर, प्राध्यापक स्थापत्य अभि. सदस्य |
| ०४ | श्री डी.एच. चव्हाण, माहिती समन्वयक अधिकारी |

प्रथम प्राचार्यांनी सर्व मान्यवरांचे व अर्थ समिती सदस्यांचे स्वागत केले व नंतर बैठकीस सुरुवात करण्यात आली व बैठकीच्या कार्यक्रम पत्रिकेवरील विषयांवर चर्चा करुन खालील प्रमाणे निर्णय घेण्यात आले.

**बाब क्र.१)** मागील अर्थ समितीच्या जा.क्र.शाअमऔ/लेखा/२०१८/२९७६ दिनांक ०७/०९/२०१८ च्या बैठकीचे इतिवृत्तान्त वाचून कायम करण्यात आले.

**बाब क्र.२)** मागील कार्यवाहीचे अवलोकन करुन सदरील विषयास मान्यता देण्यात आली.(Action Taken Report.) लेखापरिक्षणात एकूण ८ एजन्सीकडून टीडीएस कपात करण्यात आलेली नाही असे आक्षेप होते. त्यापैकी ३ एजन्सीकडून टीडीएसची रक्कम कपात करुन शासन जमा करण्यात आली आहे. उर्वरित ५ एजन्सीकडून टीडीएस वसुलीबाबत कार्यवाही १५ दिवसांत करुन शासन जमा करण्याचे सांगितले. तसेच श्री कोठारी, सी.ए. यांचा टीडीएस कपातीबाबत सल्ला घेण्याचे समितीने निर्देश दिले. TEQIP विभागातील कंत्राटी कर्मचा-याच्या जागेवर खंड देउन नव्याने जाहिरात देउन एजन्सीमार्फत दुस-या व्यक्तीची नेमणूक करण्याचे समितीने सांगितले.

**बाब क्र.३)** संस्थेची येस बँकेत असलेली रक्कम काढून एस.बी.आय. बँकेत वर्ग करावी. अन्य बँकेत करु नये. सदरील कार्यवाही ही तत्काळ करण्यात यावी. रु. २ कोटी चालु खात्यात खर्चासाठी ठेवण्यात यावे. रु. १० कोटी, परत रु. १० कोटी व उर्वरित रक्कम रु. ०६ कोटी या प्रमाणे सर्व बाकीची रक्कम एस.बी. आय. बँकेत एफ.डी. करण्याचे समितीने निर्देश दिले आहेत. अर्थ समितीच्या समितीतील सदस्याने, डॉ. यु.जे. कहाळेकर, प्राध्यापक स्थापत्य अभियांत्रिकी यांनी १५ दिवसाला रोखा विभागातील लेखाची तपासणी करण्याचे निर्देश समितीने दिले.

**बाब क्र.४)** सन १९१८-१९ या वर्षा करीता विविध विभागांना खर्चासाठी वितरीत केलेले नियमित व पुरवणी अनुदानात वाटप केलेल्या तरतुदी बाबत (आवर्ती व अनावर्ती ) चर्चा करुन नोंद घेण्यात आली.

(कृ. मागे पाहा)

**बाब क्र.०५)** आर्थिक वर्ष २०१८-१९ साठी संस्थेतील विविध विभागांना वाटप केलेल्या ( आवर्ती व अनावर्ती ) खर्चासाठी वितरीत केलेले अनुदान व दिनांक ३१/१२/२०१८ पर्यंत झालेल्या प्रत्यक्ष खर्चाचा आढावा घेण्यात आला. कांही विभागांनी फक्त ४० टक्के अनुदानच खर्च केल्याचे निदर्शनास आले आहे. तसेच स्थापत्य विभाग आणि विद्युत विभाग यांचे अनावर्ती चा खर्च ५० टक्याच्या खाली असल्याचे समितीच्या निदर्शनास आले आहे. म्हणून ज्या विभागाचा खर्च ५० टक्क्यांपेक्षा कमी झालेला आहे, अशा विभागांना त्यांच्या विभागाच्या अनुदानाबाबत सूचना करण्यात यावी असे समितीने सांगितलले. विभागांनी विद्यार्थ्यांच्या सुविधांबाबत काळजी घेण्याचे सांगितले. यापुढे विभागांनी क्वार्टरवाईझ बजेट करण्याचे समितीने निर्देश दिले.

**बाब क्र. ६)** अर्थ समितीने मास्टर ऑफ कॉम्पुटर ॲप्लीकेशन (MCA) या पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या सन २०१८-१९ या वर्षा करीता सदरील प्रवेश शुल्क घेण्यास समितीने मान्यता दिली आहे. व सन २०१९-२० या वर्षा करीता शिक्षण शुल्क वाढीचा नवीन प्रस्ताव विभागप्रमुख एमसीए यांच्याकडून घेउन मा. व्यवस्थापन मंडळ यांना सादर करण्याच्या समितीने सूचना केल्या.

**बाब क्र.७)** डॉ. विक्रम गद्रे आयआयटी, मुंबई व विभागाच्या मागणि प्रमाणे प्रयोगशाळेसाठी तांत्रिक कर्मचारी आवश्यक असल्याने एकूण २० कर्मचा-यांची एका सत्रासाठी निव्वळ तासिका तत्वावर तांत्रिक कर्मचा-याची सेवा घेण्यास व त्यासाठी लागणारे रु. १८ लक्ष अनुदानाची अंदाजपत्रकात तरतुद करण्यासाठी समितीने मान्यता दिली.

**बाब क्र.८)** या संस्थेचे जिल्हाकोषागार कार्यालय, औरंगाबाद येथे पीएलए लेखा होते. सदर लेखा कोषागार आदेश क्र.कोष/ठेव/८४८३/बंद लेखा/२०१८ दिनांक १/११/२०१८ नुसार सदर लेखा बंद करुन शासन लेखा शिर्ष क्र.००७५ या मुख्य लेखा शिर्षाखाली शासन खात्यात रु. रक्कम १२,९५,६२,६४३/- वर्ग करण्यात आले आहे. सदर रक्कम संस्थेस परत मिळण्यासाठी पाठपुरावा करण्यास समितीने सूचना केल्या.

**बाब क्र.०९)** वसतिगृहातील खरेदी केलेल्या साहित्यांची अर्थ संकल्प २०१८-१९ मध्ये समाविष्ट करुन केलेल्या खरेदीस कार्योत्तर मान्यता देण्यात आली आहे. तसेच विभागप्रमुख अणुविद्युत यांनी Raddar setup instead of Lab. view software साठी रु. १४ लक्ष घेण्यासाठी समितीने परवानगी दिली.

शेवटी सर्वांचे आभार व्यक्त करुन बैठक संपल्याचे अध्यक्षांनी जाहीर केले.

**( डॉ. पी.बी. मुरनाळ )**
प्राचार्य, तथा अध्यक्ष अर्थ समिती
शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, औरंगाबाद.

प्रत :- वरील सर्व अधिकारी यांना माहितीस्तव.